**Scholarly Research Journal for Humanity Science & English Language,**
***Online ISSN 2348-3083, SJ IMPACT FACTOR 2016 = 4.44, www.srjis.com***
*UGC Approved Sr. No.48612, DEC-JAN 2018, VOL- 5/25*

# माहितीचा अ धकार कायदयाचे अस्त्र बोथट होत चालले आहे का ? एक संशोधन

**Sawant Subhash Amar, Ph. D.**
*LGM ACS college mandangad dist ratnagiri.*

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

प्रस्तावना

देशाला स्वातंत्र  मळून अर्ध शतक होवूनही जेव्हा भारतासारख्या लोकशाहीच्या देशात लोकांच्याच स्वातंत्र्यावर जेव्हा गदा येते तेव्हा त्या देशातील लोकांचे स्वातंत्र हे गुलाम गरीत अडकलेले आहे असा त्याचा अर्थ होतो. इंग्रजांची दीडशे वर्षाची सत्ता जावून स्वातंत्र्यातील अर्ध शतकाहून अ धक काळ इंग्रजांनी केलेल्या गोपनीयतेच्या कायद्याचे पालन आपली शासन व्यवस्था करत असेल तर हे जनतेच्या हिताचे  लोकशाही राज्य आहे असे आपण म्हणू शकत नाही. देशातील वाढता भ्रष्टाचार, नोकरशाहीच्या  वळख्यात अडकलेली लोकशाही, गुन्हेगारी, दहशतवाद या मुळे देश अ धक पोखरत चाललेला होता. या मुळे लोकांचे राज्य ही संकल्पना लोकशाही राज्यातच धुळीला  मळत चाललेली होती. लोकांचे अ धकार कर्तव्य यालाही धोका निर्माण झाला होता. हे राज्य लोकांनी चाल वण्यापेक्षा सरकारी यंत्रणा मनमानी पद्धतीने चालवत होती.

या सर्व परिस्थितीचा अभ्यास करून जेष्ठ समाज सेवक अण्णा हजारे व त्यांच्या सहकाऱ्यानी संबं धत शासनाला सूचना केल्या. त्यानंतर अनेक आंदोलने केली. अशा प्रकारे खऱ्या अर्थाने हा माहितीचा अ धकार कायदा जन्मास येण्यासाठी एक तपाहून म्हणजेच बारा वर्षाहून अ धक काळ लागला. या पूर्वीच महाराष्ट्र राज्याने या कायद्याची अंमलबजावणी महाराष्ट्रामध्ये केलेली होती. या कायदयामुळे खऱ्या अर्थाने लोकांचे लोकशाही राज्य प्रस्था पत करता येईल, यामुळे लोकांची कामे आता मार्गस्थ लागतील, देशातील भ्रष्टाचार कमी होईल, असा एक आशावाद निर्माण झाला.

माहितीचा अ धकार कायदा २००५ जेव्हा मंजूर झाला तेव्हा सर्व सामान्य जनतेला जेव्हा जेव्हा अडचण निर्माण होईल तेव्हा तेव्हा त्या संब धत शासकीय अ धकाऱ्यांना माहितीच्या अ धकारात एक प्रकारे जाब  वचारील व एक प्रकारे सर्व सामान्य जनतेचा या कर्मचाऱ्यांवर दबाव निर्माण होईल. शासकीय व्यवहारातील भ्रष्टाचार कमी होईल, लोकांची कामे वेळेत होतील. यासाठी हे कायदारूपी शस्त्र जनतेच्या हातात देवून त्या शस्त्राचा वापर जनतेने करून आपल्या समस्या सोडवायच्या आहेत हा मुळ उद्देश ठेऊन हा कायदा निर्माण केला.

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

अशा या कायद्याबाबत सद्य स्थिती काय आहे, हा कायदा मंजूर होऊन एक दशकाहून अ धक काळ लोटला, या काळात लोकांना अपे क्षत बदल झाले का? लोकांनी या कायद्याचा अवलंब करून आपल्या समस्या सोड वण्याचा प्रयत्न केला का? या कायदयाच्या निर्माणामुळे देशाच्या  वकासाला चालना  मळाली का? देशातील भ्रष्टाचार कमी झाला का? या सर्वांची उत्तरे शोधण्यासाठी संशोधकाने हा अभ्यास हाती घेतला आहे.

अभ्यासाचा उद्देश

१)हा कायदा लोकांना माहीत आहे का? याचा अभ्यास करणे.

२)आपल्या व देशातील समस्या सोड वण्यासाठी ह्या कायद्याचा वापर  कती लोक करतात याचा अभ्यास करणे.

३)या कायद्यामुळे प्रशासन कामकाजात सुधारणा होवून सरकारी वर्गावर या कायद्याचा वचक निर्माण झाला आहे का? याचा अभ्यास करणे.

४)कायदया नुसार प्रत्येक शासकीय कार्यालयांनी आवश्यक ती माहीत प्र सद्ध केलेली आहे का? याचा अभ्यास करणे.

५)या कायद्यामुळे कामाचा दर्जा सुधारणे व भ्रष्टाचार कमी होणे यासाठी काही  मदत झाली आहे का? याचा अभ्यास करणे.

गृहीतके

१)या कायद्याचे महत्व व माहिती म्हणावी तसी अजूनही लोकांना समजलेली नाही.

२)या कायद्याचा वापर करून स्वताचा अथवा सार्वजनिक फायदा करणारी जनता फारच कमी दिसून येते.

३)या कायद्यामुळे सरकारी कामकाजात काही प्रमाणात सुधारणा झाली असे असले तरी बहुतांस सरकारी यंत्रणा अशा कायद्याला जुमानतांना दिसून येत नाही.

४)या कायद्यामुळे सरकार दरबारातील भ्रष्टाचार काही प्रमाणात कमी झाला.

५)जनता या कायद्याचा जेवढा जास्तीत जास्त वापर करेल तेवढा या कायद्याचा दृष्य परिणाम दिसून येईल.

माहितीचा अ धकार म्हणजे काय

भारतासारख्या लोकशाही राज्यात  कंबहुना जगातील प्रत्येक प्रांतात मानवाला जगण्यासाठी काही मूलभूत अ धकार हे दिले गेले पाहिजेत. हे अ धकार प्रत्येक राज्याने म्हणजेच देशाने आपल्या प्रजेला दिले पाहिजेत. यालाच आपण मानवा धकार असे म्हणतो. आपल्या देशातील घटनेने आपल्याला सर्व धर्म व जाती समभावापासून ते सप्त स्वातंत्र्या पर्यंत सर्व अ धकार देवू केलेले होते. परंतु दुसऱ्या

Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

बाजूने आपल्या देशातील चाललेल्या शासनाच्या कारभाराची वचारपूस करण्याचा कंवा जाब वचारण्याचा अ धकार मात्र काढून घेतलेला होता. या मुळे घटनेने दिलेल्या स्वातंत्र्याच्या तसेच मानाव धकाराच्या पूर्ण वरोधात असलेली ही घटना होती.

जागतिक पातळीवरील या संदर्भातील घटनांचा वचार केल्यास युनोने आंतरराष्ट्रीय स्तरावर 1948 साली सर्व देशांना आपआपल्या देशात लोकांचे मूलभूत अ धकार त्यांना देण्यासंदर्भात सू चत केले होते. त्या आव्हानाला सामोरे जात अमेरिकेने 1960 साली तर स्वीडन देशाने 1966 साली मानवा धकाराचा स्विकार केला. त्यानंतर 1990 साली आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने जगातील सर्वच देशांना कर्ज देण्यासाठी मानवा धकार हा कायदा आपाआपल्या देशात लागू न केल्यास त्यांना कर्ज दिले जाणार नाही असे जाहीर केले. असे असून सुद्धा आपल्या देशाने महितीचा अ धकार हा कायदा 2005 साली म्हणजेच 15 जुन 2005 रोजी संसदेत पारित केला.

महितीचा अ धकार कायद्याचे स्वरूप

माहितीचा अ धकार कायदा हा मुळातच जनतेला मुलभूत अ धकार देणारा कायदा आहे. लोकशाही राज्यात प्रत्येक व्यक्तीला सप्त स्वातंत्र देवू केली. परंतु दुसऱ्या बाजूला सरकारी कामकाज जी के जनतेच्या जीवनाचा अ वभाज्य भाग आहे त्या वषयी जाणून घेण्याचा अ धकार जर जनतेला नसेल तर आपल्या देशात खरोखरच लोकशाहीचे राज्य नव्हते हे आपण सर्वांनी मान्य केले पाहिजे. यासाठीच या कायद्याची गरज निर्माण झाली.

प्रत्येक व्यक्तिला देशातील शासकीय तसेच निम शासकीय व्यवस्थेकडून आपण कोणतीही माहिती मळू शकतो हे या कायद्याचे महत्वाचे अंग आहे. ही माहिती पूर्वी गोपनीय माहिती म्हणून ओळखली जात होती. त्यामुळेच सरकारी व्यवस्थे मध्ये भ्रष्टाचाराला चालना मळाली. जनतेला वेठीस धरले जावू लागले. जी माहिती सर्व सामान्य जनतेला सहज उपलब्ध होणे गरजेची होती ती माहिती उपलब्ध होत नव्हती. जी कामे एका व शष्ट्य वेळेत होणे गरजेची होती त्या कामांना जनतेला बऱ्याच फेऱ्या माराव्या लागत होत्या. येवढे करून ते काम केव्हा पूर्ण होईल याची खात्री नव्हती. ती वेळेत पूर्ण व्हावीत या साठी त्या व्यवस्थेशी जनताच अर्थपूर्ण व्यवहार करून आपली कामे पूर्ण करून घेत असे, त्यामुळे भ्रष्टाचाराला चालना मळाली होती. या सर्व परिस्थितीचा वचार करता या कायद्याचे महत्व अधोरे खत होते.

या कायद्याने कोणतीही माहिती (जी देशाचे संरक्षण व देशहिताच्या आड न येणारी कंवा तद्संबं धत माहिती सोडून) मागण्याचा अ धकार जनतेला दिला. कंबहुना ही माहिती देणे शासकीय यंत्रणेवर बंधनकारक केले आहे. या साठी नाममात्र शुल्क भरून ही माहिती जनतेला उपलब्ध करून दिली जाते. ही मागणी केलेली माहिती, माहिती अर्ज केल्यापासुन कमान तीस दिवसात मळावी असा नियम

आहे. या तीस दिवसात माहिती मळाली नाही कंवा चुकीची माहिती मळाली तर अपी लय अ धकाऱ्यांकडे जनतेला अर्ज करता येईल. यासाठी प्रत्येक कार्यालयाने महितीचा अ धकाराखाली माहिती देणाऱ्या व्यक्तीची नेमणूक करणे बंधनकारक केले आहे. तसेच त्यांचे वरील अ धकारी हा अपी लय अ धकारी म्हणून नेमणे कायद्याने बंधनकारक केले आहे. अशावेळी माहिती न देणारी, कंवा चुकीची माहिती देणारी व्यक्ति ही दोषी माणून कायद्यामध्ये त्यांना शक्षा देवू केलेली आहे.

या व्यतिरिक्त प्रत्येक कार्यालयाने जनते संबं धत माहिती खुली करणे हे अनिवार्य केले आहे. उदा. ग्रामपंचायत, तलाठी कार्यालये, तह सलदार इ. कार्यालयातून देण्यात येणारे दाखले कंवा तदसंबं धत माहिती, त्यामध्ये त्यासाठी लागणारी कागदपत्रे कोणती, अर्ज केल्यापासुन कती दिवसात हे काम पूर्ण होईल याचा तपसील त्या यंत्रणेने कार्यालयबाहेर जाहीर करणे गरजेचे आहे. कंबहुना एखाद्या व्यक्तिला एखादी माहिती प्रत्यक्ष येवून घ्यावयाची असेल तरीही ती त्याला घेता येईल असा हा कायदा सांगतो.

शासकीय बांधकाम तसेच व वध मक्त्यांची कामे या संदर्भातही आवश्यक ती माहिती संब धत अ धकाऱ्याने प्र सद्ध करावायाची आहे. त्या संदर्भात कागद पत्रे तपासणे कंबहुना ज्या ठिकाणी काम चालू आहे त्या ठिकांनी जावून कामाच्या गुणवत्तेची तपासणी करणे हा अ धकार या कायद्या अंतर्गत जनतेला दिला गेला आहे.

थोडक्यात या कायद्याचा वापर करून जनतेने शासनाची कार्यशीलता वाढ वणे, भ्रष्टाचाराला आळा घालणे, आ ण शासनाचा कारभार व कामकाज कार्यक्षम रीतीने चालावे यासाठीचे अस्त्र म्हणजे हा कायदा आहे. जनतेने ज्या ज्या ठिकाणी आपली कंवा जनतेची फसवणूक होत आहे हे लक्षात घेवून या कायद्याचा वापर करणे अ भप्रेत आहे. यातूनच आपल्याला अ भप्रेत असलेले कार्यक्षम आ ण कार्यशील राष्ट्र निर्माण होवू शकेल. या कायद्याचा आधार घेवून आपण सर्व लहान लहान प्रयत्नातून स्वराज्य आ ण सुराज्य आणू शकतो.

असे जरी असले तरी प्रत्यक्षात या कायद्याचा वापर कती होतो, त्यामुळे शासकीय यंत्रणा भ्रष्टाचार मुक्त होत आहे काय. जनतेला अ भप्रेत असलेले स्वराज्य यातून निर्माण झाले काय या सर्वाचा अभ्यास संशोधकाने पुढील प्रमाणे केला आहे.

माहितीचा अ धकाराचा उपयोग एक संशोधन –

माहितीचा अ धकाराचा उपयोग एक संशोधन या संशोधनासाठी रत्ना गरी जिल्ह्याचे कार्यक्षेत्र निवडले असून या जिल्ह्यातील मंडणगड, खेड, चपळूण, रत्ना गरी, राजापूर या पाच तालुक्यातून प्रत्येकी २० या प्रमाणे पाच तालुक्यातून १०० प्रश्नावल्या लोकांकडून भरून घेवून तसेच त्यांच्याशी

हितगुज करून ही माहिती गोळा केली आहे. त्या वश्लेषनावर आधारित पुढील मुद्द्यांच्या आधारे हे संशोधन पूर्ण केले आहे

महितीचा अ धकार या कायद्याच्या माहिती बाबत –

माहितीचा अ धकार या कायद्याची रत्ना गरी जिल्ह्यातील कती जनतेला माहिती आहे. याची आकडेवारी पुढील प्रमाणे आहे.

कोष्टक क्र.१

| अ. क्र. | माहितीचे स्वरूप | वयोमानानुसार संख्या | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १८ ते २५ | टक्के | २६ ते ३५ | टक्के | ३६ ते ४५ | टक्के | ४६ ते ६५ | टक्के | एकूण | टक्के |
| ०१ | कायद्याची माहिती आहे. | ०७ | २५.९२ | ११ | ३३.३३ | १३ | ५९.०९ | ०३ | १६.६७ | ३४ | ३४ |
| ०२ | कायद्याची माहिती नाही. | ०२ | ०७.४१ | - | - | - | - | ०६ | ३३.३३ | ०८ | ०८ |
| ०३ | कायद्यातील सर्व तरतुदींची माहिती नाही. | १८ | ६६.६७ | २२ | ६६.६७ | ०९ | ४०.९१ | ०७ | ३८.८९ | ५६ | ५६ |
| ०४ | सांगता येत नाही. | - | - | - | - | - | - | ०२ | ११.११ | ०२ | ०२ |
| | एकूण | २७ | १०० | ३३ | १०० | २२ | १०० | १८ | १०० | १०० | १०० |

वरील कोष्टकाचा वचार करता ३४ टक्के लोकांना हा कायदा अस्थित्वात आल्याचे माहीत असलेले दिसून येते. त्या मध्ये प्रामुख्याने तरुणांची संख्या अ धक आहे. या कायद्याची काहीच माहिती नाही सांगणारे ०८ टक्के जनता दिसून येते या मध्ये प्रामुख्याने वयोवृद्धांची संख्या अ धक दिसून येते. माहितीचा अ धकार कायद्यातील तरतुदी काय आहेत याची माहिती नाही असे ५६ टक्के जनता सांगतांना दिसून येते. या मध्ये प्रामुख्याने तरुणांची संख्या अ धक दिसून येते. या प्रश्ना संदर्भात आपणास काहीच सांगता येणार नाही असे २ टक्के जनता दिसून येते हा वर्ग वयोवृद्धा मध्ये मोडतांना दिसून येतो.

Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

या कायद्याचा आपण कधी वापर केला आहे का? –

रत्ना गरी जिल्हयातील कती लोकांनी या कायद्याचा वापर स्वता कंवा सामाजिकतेसाठी केलेला आहे त्याची माहिती पुढील प्रमाणे.

कोष्टक क्र.२

| अ. क्र. | माहितीचे स्वरूप | शक्षणानुसार संख्या | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १ ते ८ | टक्के | १० वी | टक्के | १२ वी | टक्के | डीग्री | टक्के | एकूण | टक्के |
| ०१ | होय | - | - | ०२ | ८.३३ | ०४ | ११.११ | ०१ | ४.५५ | ०७ | ०७ |
| ०२ | नाही | १८ | १०० | २२ | ९१.६७ | ३२ | ८८.८९ | २१ | ९५.४५ | ९३ | ९३ |
| | एकूण | १८ | १०० | २४ | १०० | ३६ | १०० | २२ | १०० | १०० | १०० |

वरील कोष्टकाचा वचार करता एकूण मुलाखतदारांमधील फक्त ०७ टक्के जनता ही माहितीच्या अ धकाराच्या कायद्याचा वापर करणारी दिसून येते. या मध्ये दहावी व बारावी शक्षण झालेली जनता अ धक दिसून येते. तर ९३ टक्के जनतेने अजूनही या कायद्याचा वापर केलेला नाही.

आपण या कायद्याचा वापर का करत नाही. -

रत्ना गरी जिल्हयातील जनता या कायद्याचा वापर करण्यास का तयार नाही. या पाठीमागे कोणती करणे आहेत याची माहिती पुढील प्रमाणे आहे.

कोष्टक क्र.३

| अ.क्र. | माहितीचे स्वरूप | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| ०१ | सरकारी यंत्रणेची भती वाटते. | १० | १०.७५ |
| ०२ | लोकप्रतिनिधींचा दबाव | ३४ | ३६.५६ |
| ०३ | शक्षण कमी | १५ | १६.१३ |
| ०४ | कायद्यातील अपुरी माहिती | ३४ | ३६.५६ |
| | एकूण | ९३ | १०० |

वरील कोष्टकाचा वचार करता सरकारी यंत्रणेच्या भीतीमुळे १०.७५ जनता ह्या कायद्याचा वापर करत नाही. लोकप्रतिनिधींचा दबाव व कायद्यातील अपुरी माहिती या दोन कारणांमुळे प्रत्येकी ३६.५६ टक्के जनता या कायद्याचा वापर करतांना दिसून येत नाही. तर १६.१३ टक्के जनता ही कमी शक्षण असल्याने आम्ही या कायद्याचा वापर करू शकलो नाही. असे त्यांचे मत दिसून येते.

सरकारी कार्यालयातील भ्रष्टाचाराचे स्वरूप –

या कायद्याची अंमलबजावणी झाल्या पासून जनता आतापर्यंत ज्या ज्या कार्यालयामध्ये कामासाठी जात होती कंवा जाते त्या कार्यालयातील भ्रष्टाचाराचे स्वरूप सद्य स्थितीत कसे आहे याची माहिती पुढील प्रमाणे आहे.

कोष्टक क्र.४

| अ.क्र. | माहितीचे स्वरूप | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| ०१ | भ्रष्टाचार आहे | ६७ | ६७ |
| ०२ | भ्रष्टाचार नाही | - | - |
| ०३ | भ्रष्टाचाराचे स्वरूप कमी आहे. | २३ | २३ |
| ०४ | भ्रष्टाचाराचे स्वरूप जास्त आहे. | १० | १० |
| | एकूण | १०० | १०० |

वरील कोष्टकाचा अभ्यास करता सरकारी कार्यालयामध्ये भ्रष्टाचार आहे असे म्हणणारी ६७ टक्के जनता दिसून येते. भ्रष्टाचार नाही म्हणणारी जनता एकही दिसून येत नाही. भ्रष्टाचाराचे प्रमाण कमी आहे असे म्हणणारी जनता २३ टक्के इतकी दिसून येते. तर भ्रष्टाचार सरकारी कार्यालयातून मोठया प्रमाणात होतो असे म्हणणारी १० टक्के जनता दिसून येते.

सरकारी यंत्रणा आपली कामे वेळेत करते की नाही? -

जनता ज्या सरकारी कार्यालयामध्ये आपल्या कामासाठी जाते तेथील यंत्रणा जनतेची कामे ठरलेल्या वेळेत करते का याची माहिती पुढील प्रमाणे आहे.

कोष्टक क्र.५

| अ.क्र. | माहितीचे स्वरूप | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| ०१ | कामे वेळेत करते | ०५ | ०५ |
| ०२ | कामे वेळेत करत नाही | ५४ | ५४ |
| ०३ | कामे पैसे घेवून करते. | ४१ | ४१ |
| | एकूण | १०० | १०० |

वरील कोष्टकाचा अभ्यास करता सरकारी कार्यालयामध्ये कामे वेळेत होतात असे म्हणणारी ०५ टक्के जनता दिसून येते. कामे वेळेत होत नाही म्हणणारी जनता ५४ टक्के इतकी दिसून येते. तर सरकारी यंत्रणा कामे पैसे घेवून करते असे म्हणणारी जनता ४१ टक्के इतकी दिसून येते.

सरकारी यंत्रणेवर या कायद्याचा प्रभाव आहे का ? –

सरकारी कार्यालयातील जनतेला या कायद्याची भती वाटणे कंवा या कायद्यामुळे सरकारी कर्मचाऱ्यांच्या कामात सुधारणा झाली आहे का याची माहिती पुढील प्रमाणे आहे.

कोष्टक क्र.६

| अ.क्र. | माहितीचे स्वरूप | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| ०१ | प्रभाव नाही | १७ | १७ |
| ०२ | काही प्रमाणात | ३३ | ३३ |
| ०३ | अजिबात नाही | १७ | १७ |
| ०४ | व्यक्ती नुसार | २२ | २२ |
| ०५ | सांगता येत नाही. | ११ | ११ |
| | एकूण | १०० | १०० |

वरील कोष्टकाचा अभ्यास करता या कायद्याचा सरकारी यंत्रणेवर प्रभाव नाही असे म्हणणारी १७ टक्के जनता दिसून येते. सरकारी यंत्रणेवर प्रभाव काही प्रमाणात आहे अशी म्हणणारी जनता ३३ टक्के दिसून येते. सरकारी यंत्रणेवर प्रभाव अजिबात नाही असे म्हणणारी जनता १७ टक्के इतकी दिसून येते. तर सरकारी यंत्रणेवर प्रभाव व्यक्ती नुसार दिसून येतो असे म्हणणारी २२ टक्के जनता दिसून येते. सरकारी यंत्रणेवर प्रभाव आहे की नाही हे सांगता न येणारी ११ टक्के जनता दिसून येते.

सरकारी कार्यालयाच्या बाहेर आवश्यक ती माहिती प्रद र्शत केली जाते का ? –

सरकारी कार्यालयांनी आपल्या कार्यालयातील कामाचे स्वरूप त्या साठी लागणारा वेळ, त्यासाठी लागणारी कागदपत्रे इत्यादी माहिती कार्यालयाच्या बाहेर प्रद र्शत केली आहे का ? याची माहिती पुढील प्रमाणे आहे.

कोष्टक क्र.७

| अ.क्र. | माहितीचे स्वरूप | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| ०१ | होय | ६७ | ६७ |
| ०२ | नाही | २२ | २२ |
| ०३ | सांगता येत नाही | ११ | ११ |
| | एकूण | १०० | १०० |

वरील कोष्टकाचा वचार करता एकूण मुलाखतदारांमधील फक्त ६७ टक्के जनता ही सरकारी कार्यालयाच्या बाहेर आवश्यक ती माहिती प्रद र्शत केली जाते असे सांगते. तर २२ टक्के जनतेने सरकारी कार्यालयाच्या बाहेर आवश्यक ती माहिती प्रद र्शत केली जात नाही असे सांगते. तर ११ टक्के जनतेने सरकारी कार्यालयाच्या बाहेर आवश्यक ती माहिती प्रद र्शत केली जाते की नाही या बद्दल सांगता येत नाही असे सांगते.

निष्कर्ष –

वरील सर्व माहिती वरुण खालील थोडक्यात निष्कर्ष दिसून येतात.

१) कोष्टक क्र.१ नुसार महितीचा अ धकार हा कायदा अस्तीत्वात आहे हे आम्हास माहीत आहे असे म्हणणारी ३४ टक्के जनता असून या कायद्यातील तरतुदी माहीत नसलेली जनता ५६ टक्के इतकी आहे. म्हणजेच ९० टक्के जनतेला हा कायदा आहे याची फक्त फुसटशी कल्पना कंवा माहिती असलेली दिसून येते. या वरुण या कायद्याचे महत्व व माहिती म्हणावी तसी अजूनही लोकांना समजलेली नाही हे गृहीतक सद्ध होते.

२) कोष्टक क्र. २ नुसार माहितीचा अ धकार या कायद्यांतर्गत फक्त ०७ व्यक्तींनी अर्ज केलेला दिसून येतो. या वरुण या कायद्याचा वापर करून स्वताचा अथवा सार्वजनिक फायदा करणारी जनता फारच कमी दिसून येते हे गृहीतक सद्ध होते.

३) कोष्टक क्र. ३ नुसार लोकप्रतिनिधींचा दबाव व कायद्यातील अपुरी माहिती यामुळे या कायद्याचा वापर जनता करावयास धजत नाही

४) कोष्टक क्र. ४ सरकारी कार्यालयामध्ये भ्रष्टाचार आहे असे म्हणणारी ६७टक्के जनता दिसून येते. असे जरी असले तरी भ्रष्टाचाराचे प्रमाण कमी आहे असे म्हणणारी जनता २३ टक्के इतकी दिसून येते. म्हणजेच या कायद्यामुळे सरकार दरबारातील भ्रष्टाचार काही प्रमाणात कमी झाला हे गृहीतक सद्ध होते.

५) कोष्टक क्र. ५ व ६ नुसार सरकारी कार्यालयामध्ये कामे वेळेत होत नाही म्हणणारी जनता ५४ टक्के इतकी दिसून येते. तर सरकारी यंत्रणा कामे पैसे घेवून करते असे म्हणणारी जनता ४१ टक्के इतकी दिसून येते. तर ८१ टक्के जनता ही या कायद्याचा सरकारी यंत्रणेवर प्रभाव नाही असे सांगते म्हणजेच या कायद्यामुळे सरकारी कामकाजात काही प्रमाणात सुधारणा झाली असे असले तरी बहुतांस सरकारी यंत्रणा अशा कायद्याला जुमानतांना दिसून येत नाही हे गृहीतक सद्ध होते.

६) कोष्टक क्र, ७ नुसार ६७ टक्के इतकी सर्वा धक जनता सर्व कार्यालयातून कार्यालयासंबं धत माहिती प्र सद्ध करते असे सांगतात. असे जरी असले तरी कायद्यातील तरतुदी तसेच कायद्याची आवश्यक माहिती नसलेली ९० टक्के जनता असल्याने तर काही जनता ही शक्षण कमी असल्याने या महितीचा वापर अतिशय कमी प्रमाणात करतांना दिसून येतात.

७) वरील सर्व मुद्यांच्या आधारे असे दिसून येते की या कायद्याचा प्रभावी वापर होत नसल्याने या कायद्याचा पर्यायाने जनतेचा म्हणावा तसा प्रभाव सरकारी यंत्रणेवर दिसून येत नाही. त्यामुळे आजही जनतेची कामे वेळेत न होणे, भ्रष्टाचार कमी करणे, कार्यालयांना शस्त लावणे या गोष्टी होवू शकलेल्या दिसून येत नाही. हे सर्व कशामुळे तर जनतेने या कायद्याचा प्रभावी वापर न

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

केल्यामुळे होय. म्हणजेच जनता या कायद्याचा जेवढा जास्तीत जास्त वापर करेल तेवढा या कायद्याचा दृष्य परिणाम दिसून येईल हे गृहीतक येथे सद्ध होते.

थोडक्यात या कायद्याचा मुळातच जो वरील उद्देश होता तो कायद्याच्या वापरावर अवलंबून होता. या कायद्याचा वापर योग्य पद्धतीने जनतेने करणे गरजेचे आहे. तरच देशातील या सर्व समस्या दूर करून जनतेला खऱ्या लोकशाहीचा अनुभव जगता येईल. यावरून माहितीचा अ धकार कायदयाचे अस्त्र बोथट होत चालले आहे हे सद्ध होते.

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*